वनसंपत्तीचे सर्वेक्षण या योजनेत्तर योजनेच्या ६३ अस्थाई पदांना सन २०१७-१८ मध्ये मुदतवाढ देण्याचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:-एफडीएम-२०१७/प्र.क्र.२१/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:-१८ जानेवारी, २०१८

वाचावे :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८
२) शासन निर्णय क्रमांक, महसूल व वन विभाग, एफडीएम-२०१७/प्र.क्र.२१ /फ-२, दि.२३.१०.२०१७.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- ३/योजनेत्तर/प्र.क्र.१५/(१६-१७)/२०४०,दि. २७.०१.२०१७

शासन निर्णय :-

"वनसंपत्तीचे सर्वेक्षण" या योजनेत्तर योजनेतील ६३ पदांना सन २०१७-१८ दि.०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र.२ येथील दि. २३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली होती. सदर पदांची मुदत दि.३१.१२.२०१७ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे खाली दर्शविलेल्या ६३ अस्थायी पदे ही वनविभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या ६३ अस्थायी पदांना संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.०१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या			
		अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना वृत्त, पुणे	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना वृत्त, नागपूर	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर	एकूण
१	विभागीय वन अधिकारी	-	२	-	२
२	उपविभागीय वन अधिकारी	१	-	-	१
३	वनक्षेत्रपाल	२	-	-	२
४	वनपाल	१२	२४	-	३६
५	वनसर्व्हेक्षक	५	४	१	१०
६	लिपीक-टंकलेखक	१	१	-	२
७	वनरक्षक	२	४	-	६
८	वाहन चालक	१	१	-	२
९	शिपाई	१	१	-	२
	एकूण	**२५**	**३७**	**१**	**६३**

२. या पदांवर होणारा खर्च हा प्रधान शिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), १०१ वनसंधारण विकास व पुनर्निर्मिती, ०४ कार्य आयोजनामध्ये सुधारणा व तयारी (०४) (०१) कार्य आयोजनामध्ये सुधारणा व तयारी (२४०६ ०१४९) ०१ वेतन या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ मध्ये त्याखालील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. या कालावधीमध्ये मंजूर

पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०८.०१.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११८१३५१२४२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2018.01.18 13:57:03 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

<u>प्रतिलिपी</u> :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर)
२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)/मुख्य वनसंरक्षक (सर्व)
३) वनसंरक्षक कार्य आयोजना वृत्त नागपूर/ पुणे
४) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (सर्व) (प्रादेशिक)
५) मुख्य वनसांख्यिकी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, नागपूर
६) वनसांख्यिकी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अमरावती/गडचिरोली/चंद्रपूर
९) वित्त विभाग, व्यय- १०/वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.